॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

**संदर्भ : उन्हाळी परीक्षा-२०२६ /समन्वय/२०२५-२६/८७१८** **दिनांक : २४/०३/२०२६**

## परीक्षा आवेदनपत्र भरण्याबाबतचे परिपत्रक

प्रति
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : उन्हाळी -२०२६ च्या पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक परीक्षेच्या परीक्षा आवेदन पत्राबाबत.**

**संदर्भ : १) परीक्षा/समन्वय/२०२५-२६/८४४०, दिनांक ०३/०२/२०२६**
**२) परीक्षा/समन्वय/२०२५-२६/८६३९ दिनांक २६/०२/२०२६**
**३) परीक्षा/समन्वय/२०२५-२६/८६६५/दिनांक ०५/०३/२०२६**
**४) परीक्षा/समन्वय/२०२५-२६/८६७३/दिनांक १०/०३/२०२६**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ च्या परीक्षेपासून विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र भरण्यासाठी एकुण पाच वेळा विद्यापीठामार्फत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक ०१/०४/२०२६ पासून सुरु होणार आहेत व प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक १६/३/२०२६ पासून सुरु झालेल्या आहेत.

उन्हाळी-२०२६ च्या परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र भरण्यासाठी विद्यार्थ्यांना/महाविद्यालयांना एकुण पाच वेळा मुदतवाढ देवूनही महाविद्यालयांच्या प्राचार्याकडून विद्यार्थ्यांच्या परीक्षा आवेदनपत्रावर स्वाक्षरी करून विद्यापीठात जावून सदर परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याबाबत अग्रेषीत करण्यात येत असल्याचे निदर्शनास आलेले असून, ही बाब विद्यापीठ प्रशासनाच्या दृष्टीने अडचणीची होत आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व संबंधित प्राचार्याना विनंती करण्यात येते की, उन्हाळी-२०२६ च्या परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र भरण्याची मुदत संपलेली असून, परीक्षा आवेदनपत्र स्विकारण्याबाबत विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठविण्याकरीता शिफारस करून नये. सद्यस्थित कोणत्याही परिस्थितीत परीक्षा आवेदनपत्र स्विकारले जाणार नाहीत, याबाबत सर्वसंबंधिताना माहिती देवून विद्यापीठास सहकार्य करावे.

**प्र. संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव :-**
१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.